दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
वर्ष-४
अंक - ४६
epaper.diwanews.com

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नांनी 'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो' प्रकल्पाला मिळणार गती...**
पान ५ वाचा...

www.diwanews.com ♦ सोमवार,१६ जून २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिव्यात शहर नियोजन आहे कुठे?

# रस्त्याच्या दुतर्फा बसणाऱ्या फेरीवाल्यांमुळे संपूर्ण दिव्याचाच बाजार झालाय...


**दिवा न्यूज/रोखठोक**


**दिव्यातील** बेडेकर नगर येथे एका फेरीवाल्याने नागरिकावर हल्ला करण्याचा प्रकार नुकताच घडला. दिव्यात परप्रांतीय फेरीवाल्यांची संख्या वाढली आहे ही वस्तुस्थिती आहे. वाढलेल्या संख्येबरोबर फेरीवाल्यांची दादागिरी वाढली हेही नाकारता येणार नाही. मराठमोळ्या दिव्यात अमराठी लोकांची संख्याही वाढत आहे. मागील काही वर्षात दिव्यात सामाजिक परिस्थिती काही प्रमाणात बदलताना दिसत दिव्यात असणऱ्या फेरीवाल्यांमध्ये परप्रांतीय फेरीवाल्यांची संख्या सर्वाधिक आहे.

अन्य शहरांमध्ये फेरीवाले हे नम्रपणे आपला व्यवसाय करताना दिसतात. दिवा सोडल्यास अन्य ठिकाणी फेरीवाला झोन फेरीवाल्यांसाठी स्वतंत्रपणे निर्माण केलेला असतो.परंतु दिव्यात बहुतांश ठिकाणी फेरीवाल्यांची मुजोरी पाहायला मिळते.त्याआधीही फेरीवाल्यांची मुजोरी सर्वसामान्य नागरिकांना ठीक ठिकाणी जाणवत असल्याच्या घटना घडल्या आहेत.वाहन चालकांना फेरीवाल्यांचा मनस्ताप दर दिवशी सहन करावा लागतो. रहिवाशी भागामध्ये असणऱ्या मुख्य रस्त्यांवर त्या भागातील नागरिकांनी वाहने पार्क केल्यास फेरीवाले रस्त्यावर वाहने लावण्यास विरोध करतात. दिव्यात ही विचित्र परिस्थिती पाहायला मिळते.मुळात जे वाहनचालक रस्त्याचा कर भरतात त्या वाहन चालकांना रस्त्याच्या एका बाजूला स्वत:च्या इमारतीखाली वाहन उभे करण्यास फेरीवाल्यांकडून होणारा विरोध हा फक्त दिव्यातच पाहायला मिळतो. विचित्र परिस्थिती आहे. या फेरीवाल्यांना दिवा शहर जणूकाही महापालिकेने आनंद दिले आहे.दिव्यामध्ये प्रशासकीय शिस्त लावण्यात पालिका प्रशासन अपयशी ठरले आहे, हे जे आम्ही नेहमी सांगतो त्याचे हे उदाहरण आहे. संपूर्ण दिव्याचा बाजार पालिका प्रशासनाने मांडला आहे. रहिवासी क्षेत्राला सुद्धा मार्केट बनवून टाकले आहे.दिवा शहरात काही ठराविक ठिकाणी फेरीवाला झोन महापालिकेने करायला हवे होते. ज्या ठिकाणी नागरिकांची वर्दळ नाही अशा ठिकाणी फेरीवाल्यांना बसण्यास परवानगी द्यायला हरकत नाही. मात्र मुख्य रहदारीच्या रस्त्यांवर दुतर्फा फेरीवाले बसवणे म्हणजे शहराला बकाल करणे असेच म्हणावे लागेल. शहराची नियोजनकर्ती असणऱ्या महापालिकेला स्वत:च्या शहराची वाट लावण्यात इतका आनंद का? हा प्रश्न या ठिकाणी पडतो. नागरिकांना चालायला रस्ते नाहीत.फुटपाथ आणि रस्त्याच्या दोन्ही बाजू फेरीवाल्यानी व्यापलेल्या असतात.नागरिकांना रस्त्याच्या मधून चालावं लागतं. आधीच दिव्यातील रस्ते हे अरुंद आहेत.

वाहन चालकांना त्यांच्या घराजवळ काही काळासाठी सुद्धा वाहन उभी करता येत नाही. ही परिस्थिती बदलायला हवी. दिवा शहराला ठाणे महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी फेरीवाल्यांच्या या मनमानीपासून मुक्तता द्यायला हवी. फेरीवाल्यांसाठी स्वतंत्र जागेचे नियोजन करून त्या ठिकाणी फेरीवाला झोन निर्माण करायला हवा. असे केल्यास दिवा शहरातील गर्दीवर काही प्रमाणात नियंत्रण आणता येईल. अन्यथा संपूर्ण दिवा शहरातच फेरीवाल्यांच्या मनमानीमुळे बकाल स्वरूप आल्याशिवाय राहणार नाही.

## नागरिकांसाठी रस्ते मोकळे करा, फेरीवाल्यांसाठी स्वतंत्र फेरीवाला झोन हवा







# कोमसापची कळवा शाखा ठाण्यातील सांस्कृतिक चळवळ पुढे नेईल

## ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अशोक बागवे यांचे प्रतिपादन,माउलींच्या पसायदानाने रसिक झाले मंत्रमुग्ध

**ठाणे** - कोमसापच्या कळवा शाखेची सुरुवात माऊलींच्या पसायदान या कार्यक्रमाने झाली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने वारकरी संप्रदायची धुराच कळवा शाखेने आपल्या खांद्यावर घेतली असून ठाण्यातील सांस्कृतिक चळवळ कोमसापची ही कळवा शाखा पुढे नेईल असा विश्वास ज्येष्ठ साहित्यिक आणि कवी प्रा. अशोक बागवे यांनी व्यक्त केला. आपल्या खास शैलीत प्रा. अशोक बागवे यांनी माउलींच्या पसायदानाचे केलेले निरूपण रसिकांना एक वेगळी अनुभूती देऊन गेले.

कोमसापच्या कळवा शाखेच्या वतीने तसेच मनीषा विद्यालय आणि यशोगंगा संस्था यांच्या सहकार्याने
प्रा. अशोक बागवे यांच्या अभ्यासातून सादर करण्यात येत असलेल्या माऊलींचे पसायदान या पहिल्या जाहीर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला कोमसापच्या केंद्रीय अध्यक्षा नमिता कीर, केंद्रीय कार्याध्यक्ष प्रा.प्रदीप ढवळ, ठाणे जिल्हाध्यक्ष बाळ कांदाळकर, मनीषा विद्यालयाचे प्राचार्य पाष्टे सर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. अशोक बागवे यांनी यावेळी कोमसापच्या कळवा शाखेचे विशेष कौतुक यावेळी केले. कोमसापची पहिली ही शाखा आहे ज्या शाखेने पहिलाच जाहीर कार्यक्रम हा माऊलींच्या पसायदाचा ठेवला. त्यामुळे कळवा शाखेने जाणू वारकरी संप्रदायची धुराच खांद्यावर घेतली आहे. पुणे आणि मुंबईत आता कार्यक्रमांसाठी रसिक जात नाहीत मात्र कोमसापच्या पहिल्याच कार्यकमाला एवढ्या मोठ्या प्रमाणात झालेली रसिकांची गर्दी पाहता कळवा शाखा ही ठाण्यातील सांस्कृतिक चळवळ पुढे नेईल असा विश्वास प्रा. बागवे यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या केंद्रीय अध्यक्षा नमिता किर यांनी कळवा शाखेला शुभेच्छा देत या शाखेची



सुरुवात माउलींच्या पसायदानाने झाली याचा विशेष आनंद वाटत असल्याचे सांगितले. प्रा. प्रदीप ढवळ यांनी कळवा शाखा ही कोमसापची ७२ वी शाखा असून नवोदित साहित्यिक लेखकांना एक हक्काचे व्यासपीठ मिळाले असल्याचे सांगितले. पद्मश्री मधू मंगेश कर्णिक यांनी कोमसापची स्थापना केली. आज प्रत्येक शाखेत वेगवेगळे साहित्यिक कार्यक्रम सुरु असतात, कळव्यातील साहित्य क्षेत्रातील मंडळींनी एकत्र येऊन ही शाखा स्थापन केली याचा विशेष आनंद वाटत असल्याचे प्रा.ढवळ यांनी सांगितले. तर कळवा शाखेचे अध्यक्ष निशिकांत महांकाळ यांनी कळवा शाखेची भूमिका स्पष्ट करत यापूढे मोठ्या प्रमाणात साहित्यिक उपक्रम राबवणार असल्याचे सांगितले. यावेळी कार्याध्यक्ष डॉ विलास शिंदे, कार्यवाह प्रवीण सोनावणे, कोषाध्यक्ष सुशांत दोडके, कार्यकारणी सदस्य जागताप, सुदर्शन साळवी, राजेंद्र ठाकूर, सुधाकर फडके, प्रजापती, तसेच कार्यकारणीच्या सर्वच सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा पाटील यांनी केले तर आभार प्रा डॉ विलास शिंदे यांनी मानले.

# घरे, वीज, पाण्याच्या तक्रारी समस्या तातडीने निकाली..

## न्याय मिळालेल्या नागरिकांकडून आमदार संजय केळकर यांचा सत्कार..

ठाणे: प्रकल्पासाठी शेतजमीन देऊनही मोबदला न मिळालेल्या वसई येथील शेतकऱ्याचा प्रश्न आमदार संजय केळकर यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून मार्गी लावत दिलासा दिला तर ठाण्यातील भीमनगर येथील एसआरए प्रकल्प क्लस्टरमधून वगळण्यास भाग पडल्याने तेथील रहिवाशांनी श्री. केळकर यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.
जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून ठाण्यासह आजूबाजूच्या शहरातील नागरिकही समस्या घेऊन येत आहेत. बहुतांशी समस्या जागीच निकाली काढल्या जात आहेत. आज न्याय मिळालेल्या नागरिकांनी आमदार संजय केळकर यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी खोपट कार्यालयात परिवहन सदस्य विकास पाटील, माजी उपमाहापौर सुभाष काळे, सचिन पाटील, दीपक जाधव राजेश गाडे उपस्थित होते.
आज खोपट येथील भाजपच्या मुख्यालयात आयोजित जनसेवकाचा जनसंवाद या उपक्रमात वसई येथील शेतकऱ्याने आमदार संजय केळकर यांची भेट घेत व्यथा मांडली. एका प्रकल्पात शेतजमीन संपादित झाली पण मोबदला देण्यात टाळाटाळ होत असल्याची तक्रार  त्याने केली. यावेळी श्री. केळकर यांनी तत्काळ संबंधित महसूल अधिकाऱ्याशी फोनवर चर्चा केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्याने सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्याला लवकरात लवकर मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल असे सांगितले. रखडलेला प्रश्न तत्काळ मार्गी लागल्याने शेतकऱ्याने श्री. केळकर यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.
उपक्रमात ठाण्यातील भीमनगर येथील नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहत आमदार संजय केळकर यांचा सत्कार करून आभार मानले. येथे सुरू असलेला एसआरए प्रकल्प क्लस्टर योजनेत समाविष्ट करण्यात आल्याने येथील गोरगरीब रहिवाशांचा हक्काच्या घरांचा प्रश्न आ वासून उभा राहिला होता. रहिवाशांनी श्री. केळकर यांच्याकडे तक्रार केल्यानंतर श्री. केळकर यांनी पाठपुरावा करत एसआरए योजना क्लस्टरमधून वगळण्यास अधिकाऱ्यांना भाग पाडले. रहिवाशांचा घरांचा प्रश्न मार्गी लागल्याने त्यांनी श्री. केळकर यांचे आभार मानले.
शुक्रवारी झालेल्या या उपक्रमात बिल्डरने केलेल्या फसवणुकीची तीन प्रकरणे आ. केळकर यांच्याकडे सादर करण्यात आली. त्यावर त्यांनी तातडीने कार्यवाही सुरू केली. दोन सफाई कामगारांना वारसा हक्काचा लाभ मिळवून देण्यात आला. विशेष म्हणजे श्री. केळकर यांनी पाठपुरावा केल्याने प्रकल्पात बाधित नागरिकांना सोमवारी गाळेवाटप करण्यात येणार असल्याने रहिवाशांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.
भाईंदर पाडा येथील नाल्याची सफाई न झाल्याने पावसाळ्यात नागरिकांना पूरस्थिती आणि आरोग्याचा प्रश्न भेडसावण्याची शक्यता असल्याने त्यांच्या तक्रारीनुसार श्री. केळकर यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून कार्यवाही सुरू केली. तर बीएसयुपी इमारतीमधील समस्या दूर करण्यासाठी अधिकाऱ्यांना कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना श्री. केळकर यांनी केल्या.

**विजयनगर सोसायटीला मिळणार अखंडित वीज पुरवठा**

गेले अनेक महिने विजयनगर को-ऑप. सोसायटीच्या इमारतींमधील शेकडो रहिवाशांचे अनियमित वीजपुरवठ्यामुळे हाल होत आहेत. येथील रहिवाशांनी श्री. केळकर यांच्याकडे तक्रार केल्यानंतर संबंधित महावितरण अधिकाऱ्यांशी चर्चा करून मार्ग काढण्यात आला. त्यामुळे या रहिवाशांना नियमित आणि पुरेशा वीज पुरवठ्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिवा पोलीस चौकीत महिला पोलीस अधिकारी द्या, भाजपच्या सपना भगत यांची मागणी

**दिवा:**-दिवा पोलीस चौकी मध्ये कायमस्वरूपी महिला पोलीस अधिकारी नियुक्त करावा जेणेकरून येथील महिला वर्गाला त्यांच्या तक्रारी व अडचणी दिव्यातच नोंदवता येतील, असे सांगत भाजपच्या सपना भगत यांनी दिवा पोलीस चौकीत कायमस्वरूपी महिला पोलीस अधिकारी नेमण्याची मागणी केली आहे.

सौ.सपना भगत म्हणाल्या की,दिवा शहरात महिलांवर होण्र्या अन्यायाचे प्रमाण वाढले आहे. असे असताना देखील दिवा पोलिस चौकी मध्ये एकही महिला पोलिस अधिकारी नाही. तीन दिवसा पूर्वी एका महिलेवर रात्रीच्या वेळी अत्याचार झाल्याची घटना घडली असता सदर महिला रात्री १.३० वाजता पोलिस चौकीत गुन्हा दाखल करण्यास आली असता महिला पोलिस अधिकारी नसल्या कारणाने तिला मुंब्रा पोलिस स्टेशनला जायला सांगितले असे सपना भगत म्हणाल्या. रात्रीच्या वेळी महिलेने मुंब्रा पोलिस चौकीला जाणं महिलेच्या सुरक्षेच्या दृष्टीने जोखमीचे आहे. असे सपना भगत यांनी म्हटले आहे. या प्रकरणाची दखल घेत सपना भगत यांनी दिवा शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्न चिन्ह निर्माण केल आहे. या पूर्वी ही सौ.सपना भगत यांनी महिला पोलिस अधिक्र्याची मागणी केली होती.त्यावेळी त्यांच्या मागणीची दखल घेत महिला पोलिस अधिक्र्याची नेमणूक करण्यात आली होती. पण काही तांत्रिक कारणास्तव त्यांना मुंब्रा पोलिस चौकीला पाठवण्यात आले.

दिवा शहरातील महिलांवर होण्र्या अन्यायाच्या घटनांचा वाढता आलेख बघता दिवा पोलिस चौकी मध्ये महिला पोलिस अधिक्र्यांची तात्काळ पण कायमस्वरूपी नियुक्ती करावी अशी मागणी भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ सपना रोशन भगत व त्यांचे सहकारी मनीषा शालबिद्रे, साक्षी गावणकर,साधना सिंग, प्रियांका माडभगत, विठ्ठल गावडे यांनी केली आहे.

# नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी दिव्यातील मुख्य रस्ते फेरीवाले मुक्त करा - ज्योती पाटील

दिवा:- दिवा शहरात फुटपाथ व रस्त्यावर बसण्र्या फेरीवाल्यांमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून यातून अपघात व मारहाणीचे प्रकार घडत आहेत.महापालिका फेरीवाल्यांकडून पैसे वसूल करण्याच्या नादात संपूर्ण दिव्यात फेरीवाले बसवत असून सर्वसामान्य जनतेला वेठीस का धरत आहे ? असा सवाल शिवसेना ठाकरे गटाच्या संघटिका ज्योती पाटील यांनी केला आहे. बेडेकर नगर येथे सर्वसामान्य मराठी माणसाला फेरीवाल्यांकडून मारहाण झाल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला. यानंतर दिव्यातील मुजोर फेरीवाल्यांचा प्रश्न पुन्हा निर्माण झाला असून याबाबतचा शिवसेना ठाकरे गटाच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी ठाणे महानगरपालिकेला महत्त्वाचे पाच प्रश्न विचारले आहेत. दिव्यातील सर्व रस्त्यांवर दुतर्फा फेरीवाले बसवण्याची परवानगी महापालिका प्रशासन कशी देते ? संपूर्ण दिव्यात दिवा-आगासन मुख्य रस्ता, दिवा-मुंब्रा देवी कॉलनी - दातिवली रोड रस्ता, स्टेशन रोड परिसर या भागात रस्त्याच्या दुतर्फा बसवण्यात आलेले फेरीवाल्यांकडून पन्नास रुपये प्रमाणे वसूल होणारी रक्कम कोणाच्या खिशात जाते ? फेरीवाल्यांकडून वसूल होण्र्या पन्नास रुपयांसाठी महापालिका दिवा शहरातील नागरिकांच्या जीवाशी का खेळत आहे ? महापालिकेने कोणकोणत्या खाजगी व्यक्तींना फेरीवाल्यांचे पैसे वसूल करण्याचे अघोषित कंत्राट दिले आहे ? असे प्रश्न उपस्थित करून ज्योती पाटील यांनी महापालिका प्रशासनाच्या दिव्यातील कारभारावरच प्रश्न उपस्थित केले आहेत.

पालिका प्रशासनाने खरे तर दिवा शहरातील मुख्य रहदारीचे रस्ते हे मोकळे करायला हवेत व फेरीवाल्यांसाठी स्वतंत्र फेरीवाला झोन निर्माण करायला हवा.मात्र तसे न करता संपूर्ण दिव्यालाच फेरीवाला झोन करण्याची किमया पालिका प्रशासनाने केली असल्याची टीका ज्योती पाटील यांनी केली आहे.दिवा शहरात फेरीवाल्यांची वाढलेली मनमानी याला पालिका प्रशासन आणि मागील काही वर्ष महापालिकेत सत्ता राबवण्र्यांचे पाठबळ असल्याचा आरोप ही ज्योती पाटील यांनी केला आहे. दिवा शहर फेरीवाले मुक्त करा अशी मागणी त्यांनी आता पालिका आयुक्तांकडे केली आहे.

*मी पालिका आयुक्तांना पाच प्रश्न विचारले आहेत.त्या पाच प्रश्नांची उत्तरं पालिका आयुक्त यांनी द्यावीत. दिवा शहरात सर्वच रस्त्यांवर दुतर्फा फेरीवाले कसे काय बसतात ? फेरीवाल्यांसाठी स्वतंत्र फेरीवाला झोन का नाही ?आणि नागरिकांना चालण्यासाठी मोकळे फुटपाथ का नाहीत ?याची उत्तरे महापालिकेने द्यावीत*

 - **ज्योती पाटील,** दिवा शहर संघटिका
। शिवसेना ठाकरे गट

# धोकादायक इमारतीतून परिवहनचा कारभार... कर्मचाऱ्यांना जीव मुठीत धरून करावे लागते काम,तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची ठाणे कॉंग्रेसची मागणी

**ठाणे :** परिवहन सेवेतील वागळे आगार येथील प्रशासकीय इमारत तसेच वाहतूक भवन इमारतींचे सन १९९८ साली बांधकाम करण्यात आले पण तेव्हापासून कुठल्याही मोठ्या स्वरूपाच्या दुरुस्तीचे काम न झाल्याने या दोन्ही इमारतींच्या बाहेरील बाजूतील भिंत व आरसीसी बांधकाम नादुरुस्त झाल्यामुळे सन २०17 रोजी स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असता या दोन्ही इमारती ष्२-ँ श्रेणीत दर्शविल्याने इमारतींची तातडीने दुरुस्ती केल्यास इमारतीचे आयुर्मान किमान १५ ते २० वर्षे वाढेल असे वर्तविले होते.परंतु या स्ट्रक्चरल ऑडिटला आठ वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटून देखील कुठलेही दुरुस्तीचे काम न केल्याने इमारतींची दुर्दशा झाल्याने कर्मचार्यांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत असल्याची बाब ठाणे कॉंग्रेस चे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी आयुक्तांना पत्राद्वारे निदर्शनास आणून दिली आहे.

महापालिकेकडून विविध प्रकल्पांवर हजारो कोटी खर्च परंतु परिवहनकडे मात्र दुर्लक्षङ आज याबाबत कॉंग्रेस च्या शिष्टमंडळाने परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे यांची भेट घेत इमारतींची पाहणी केली असता वाहतूक भवन या इमारतीत कंडक्टर ड्रायवरचा रेस्ट रूम,तिकिटांचा साठा ,रेकॉर्ड रूम ,कॅश रूम, युनियन ऑफिस असून इमारतीचे कॉलम बीम व बाहेरील बाजूतील प्लास्टर बरेच ठिकाणी खराब झाले असून लीकेजचा प्रॉब्लेम असून इमारतीचे आतील भागातील प्लास्टर पडत असल्याचे निदर्शनास आले. यावेळी बोलताना राहुल पिंगळे यांनी सांगितले की ठाणे महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी पावसाळ्यापूर्वी शहरातील धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून यादी जाहीर केली जाते कारण धोकादायक इमारती पावसाळ्यात कोसळून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता असते. यापूर्वी देखील अशा घटना घडल्या असून त्यात नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे.असे असताना देखील व शेकडो कर्मचारी काम करत असलेल्या स्वतःच्या इमारतींकडे मात्र महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.यावेळी त्यांच्या सोबत माजी परिवहन सदस्य भालचंद्र महाडिक, सेवादल अध्यक्ष रवींद्र कोळी,महिला अध्यक्ष स्मिता वैती, संगीता कोटल, सुमन वाघ,श्रीरंग पंडित,अंजनी सिंग,अकिंदर टमाटा श्रीकांत गाडीलकर, अजिंक्य भोईर आदी पदाधिकारी उपस्थित होते

*भविष्यात कोणतीही मोठी दुर्घटना घडू नये याकरता या दोन्ही इमारतींचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून प्राप्त होण्र्या अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती अथवा अतीधोकादायक ठरल्यास त्यांचा पुनर्विकास हाती घेणे आवश्यक आहे.*

**-राहुल पिंगळे**

# एसटीच्या अधिकृत हॉटेल-मोटेल थांब्याबाबत नवीन आचारसंहिता लागू

**मुंबई:**परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दोन दिवसापूर्वी पंढरपूर दौ्यावर असताना अचानक एसटीच्या अधिकृत हॉटेल थांब्याला भेट दिली. तेथे असलेल्या प्रवाशांच्या सोयी -सुविधा बाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यामुळे खडबडून जागे झालेल्या एसटी महामंडळाने त्वरित एक परिपत्रक काढून संपूर्ण राज्यातील अशा हॉटेल-मोटेल थांब्या बाबत नवीन आचारसंहिता जारी केली आहे.

यापुढे नवीन हॉटेल थांब्याला पारदर्शक निविदा प्रक्रियेद्वारे मान्यता देत असताना ती ३ वर्षासाठी दिली जाईल परंतु १ वर्षानंतर संबंधित हॉटेल थांब्यावरील सेवा- सुविधाचा फेर आढावा घेऊन पुढील २ वर्षीच्या मुदत वाढी बाबत विचार केला जाणार आहे. तसेच या हॉटेल थांब्याची निवड करताना तेथील स्वच्छता, अन्नपदार्थ दर्जा आणि बसेसची पार्किंग व्यवस्था यांचा प्राधान्याने विचार केला जावा, असे देखील निविदा प्रक्रियेत नमूद केले जाणार आहे. तसेच या हॉटेल थांब्याची शिफारस करताना त्या क्षेत्रातील आगार व्यवस्थापक, विभागीय वाहतूक अधिकारी व विभाग नियंत्रक यांनी प्रत्यक्ष भेटून पाहणी करणे अपेक्षित आहे. त्यांच्या वस्तुस्थितीजन्य अहवालाच्या आधारे संबंधित हॉटेल थांब्याला मंजुरी दिली जाणार आहे. त्यामुळे भविष्यात या हॉटेल थांब्या संदर्भात कोणतीही प्रवासी तक्रार उद्भवल्यास संबंधित अधिक्र्यांच्या वर जबाबदारी निश्चित करुन कडक कारवाई करण्यात येणारा आहे. तसेच संबंधित हॉटेल तामिनी महामंडळाची फसवणूक केल्याबद्दल त्यांच्यावर एफ. आय. आर. देखील दाखल केला जाईल अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच मार्ग तपासणी पथकाच्या माध्यमातून वेळोवेळी या हॉटेल थांब्याची तपासणी करण्याच्या सूचना देखील मध्यवर्ती कार्यालयाकडून देण्यात आलेले आहेत. एकंदर प्रवाशांना योग्य प्रकारे सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी या हॉटेल थांब्याची निवड करावी, तसेच त्यातून एसटी महामंडळाचा महसूल देखील वाढवा अशा दुहेरी उद्देशाने नवे हॉटेल- मोटेल धोरण एसटी महामंडळाने जारी केले आहे.

# गायमुख- भाईंदर रस्ते प्रकल्पाच्या रद्द केलेल्या निविदाप्रकरणी एमएमआरडीएची एल अँड टी कडून अधिकृत दर तपशीलांची मागणी

**मुंबई:**-गायमुख ते फाऊंटन हॉटेल जंक्शनदरम्यानच्या बोगदा प्रकल्प आणि फाऊंटनहून भायंदरकडे जाण्रया उन्नत रस्त्याच्या प्रकल्पासाठी एल अँड टीने सर्वोच्च न्यायालयात केलेल्या प्रतिज्ञापत्रातील दरांच्या दाव्यानंतर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने कंपनीकडे अधिकृतपणे हे आर्थिक अंदाज सादर करण्याची विनंती केली आहे. या दोन्ही महत्वाकांक्षी प्रकल्पांची निविदा प्रक्रिया एमएमआरडीएने लोकहितासाठी रद्द केली होती.

एल अँड टीने निविदा प्रक्रियेत सहभाग घेतला होता, परंतु तांत्रिक परीक्षणात कंपनीची बोली 'नॉन-रेस्पॉन्सिव्ह' ठरवण्यात आली. त्यानंतर कंपनीने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत एमएमआरडीएचा निर्णय आव्हान दिल. सुरुवातीला न्यायालयाने निविदा उघडण्यावर तात्पुरती स्थगिती दिली होती, पण २० मे रोजी सविस्तर सुनावणीनंतर याचिका फेटाळली आणि एल अँड टीने काही महत्वाची माहिती दडपल्याचे नमूद केले. न्यायालयाने एमएमआरडीएचा तांत्रिक मूल्यमापन प्रक्रिया योग्य ठरवत पुढील प्रक्रिया सुरू ठेवण्यास परवानगी दिली. एल अँड टीच्या विनंतीवरून, न्यायालयाने त्यांची किंमत बोली दोन आठवड्यांसाठी जतन करून ठेवण्याचे निर्देश दिले.

या निर्णयाविरोधात एल अँड टीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सुनावणीत दरम्यान, एल अँड टीने स्वखुशीने आपले दर जाहीर केले व दावा केला की त्यांची बोली इतर पात्र प्रतिस्पर्ध्यांपेक्षा लक्षणीय कमी आहे बोगद्याकरिता ?६,४९८ कोटी व उन्नत रस्त्यासाठी ?५,५५४ कोटी इतके असल्याचे नमूद केले. यावर प्रत्युत्तर देताना एमएमआरडीएने सांगितले की, महाटेंडर प्रणालीच्या नियमांनुसार अपात्र ठरलेल्या संस्थेच्या आर्थिक निविदा उघडता येत नाहीत. मात्र पारदर्शकतेच्या आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून, एमएमआरडीएने संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने निविदा मागवण्याची तयारी दर्शवली. सर्वोच्च न्यायालयाने एमएमआरडीएच्या या भूमिकेची नोंद घेत एल अँड टीच्या याचिका 'निष्फळ' ठरवून फेटाळल्या आणि प्रकरण निकाली काढले. न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले की राज्य सरकारने सार्वजनिक हितासाठी निविदा रद्द करण्याचा निर्णय योग्यरित्या घेतला आहे. यासोबतच मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालात कोणतीही बदल न करता तो कायम ठेवण्यात आला. यामुळे एल अँड टीची अपात्रता आणि एमएमआरडीएच्या निविदेतील 'पूर्वीच्या प्रकल्प अपयशाची माहिती देण्याची अट' यास न्यायलयीन पाठबळ मिळाले. आता या निकालामुळे एमएमआरडीएची संपूर्ण प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या आणि तांत्रिकदृष्ट्या योग्य ठरली आहे.

एल अँड टीने न्यायालयात जाहीर केलेल्या दरांच्या पार्श्वभूमीवर एमएमआरडीएने कंपनीकडे पत्र लिहून विचारणा केली आहे की, त्यांनी मूळ निविदेतील सविस्तर दर, आधारभूत विश्लेषण, तांत्रिक तपशील आणि इतर स्पष्टीकरणे अधिकृतपणे सादर करावी. हे तपशील निविदा पुन:प्रक्रियेसाठी नवा बेस दर निश्चित करताना उपयोगी ठरणार आहेत.

एमएमआरडीए एल अँड टीची जुनी किंमत निविदा का उघडू शकत नाही?

महताडर ई-टेंडरिंग प्रणालीच्या घऊ सुरक्षा नियमानुसार, निविदा प्रक्रियेत अपात्र ठरलेल्या स्पर्धकांची किंमत निविदा उघडता येत नाही. एमएमआरडीएने सर्वोच्च न्यायालयात ही निविदा लोकहितासाठी स्वखुशीने रद्द केल्याचे सांगितल्यावर, न्यायालयाने याचिका निकाली काढत पूर्ण प्रक्रिया निष्प्रभ ठरवली. त्यामुळे जुनी निविदा आता कायदेशीर आणि तांत्रिकदृष्ट्या सील स्थितीतच आहे. म्हणूनच एमएमआरडीएने एल अँड टीकडे अधिकृतपणे विचारणा केली आहे की त्यांनी न्यायालयात सादर केलेले दर, विश्लेषण आणि इतर माहिती पुन्हा सादर करावी, जेणेकरून आयआयटीच्या तज्ज्ञांनी यावर फेरपरीक्षण करता येईल.

एल अँड टीची अपात्रता का ठरली?

एल अँड टीला निविदा प्रक्रियेतून दोन ठोस कारणांमुळे अपात्र ठरवण्यात आलं. एक म्हणजे तेलंगणातल्या मेडीगड्डा बंध्र्याच्या दुर्घटनेविषयी आवश्यक कागदपत्रं न सादर करणं, आणि दुसरं म्हणजे पूर्वीच्या प्रकल्प कोसळल्यानंतल निविदा प्रक्रियेतील मुख्य निकषांनुसार पात्रता न ठरणं. आयआयटी मुंबईच्या तज्ज्ञ टीमनं स्वत: घटनास्थळी जाऊन त्या बंध्र्याची पाहणी केली होती. आणि तेलंगणा सरकारनं दिलेल्या अधिकृत पत्रात देखील बंधारा कोसळला असून आणि तो पूर्णपणे नव्यानं बांधावा लागेल, हे स्पष्टपणे सांगितलं होतं. त्यामुळे एमएमआरडीएनं निविदेतील नियमांनुसार एल अँड टीची बोली 'नॉन-रेस्पॉन्सिव्ह' म्हणजेच अपात्र ठरवली. नियमानुसार कोणत्याही प्रकल्प बांधुन तो वापरात आणल्यानंतर तो २ वर्षांच्या आत कोसळला, तुटला असु नये.

## कनिष्ठ महाविद्यालयांच्या बायफोकल अभ्यासक्रमाच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी

### भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची विनंती

**ठाणे:** अकरावीच्या बायफोकल (द्विलक्षी) अभ्यासक्रमासाठी राज्य सरकारकडे कनिष्ठ महाविद्यालयाकडून सादर झालेल्या योग्य प्रस्तावांना मान्यता द्यावी, अशी विनंती भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे केली आहे.

बायफोकल अभ्यासक्रमाकडे वळण्रया विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेशासाठी ५ जून रोजी मुदत होती. मात्र, राज्यातील अनेक महाविद्यालयांचे बायफोकल अभ्यासक्रमांना मान्यता देण्याचे प्रस्ताव कौशल्य विकास विभागाकडे अंतिम शासन निर्णय घेण्यासाठी प्रलंबित आहेत, याकडे भाजपाचे कोकण पदवीधर प्रकोष्ठ संयोजक सचिन बी. मोरे यांनी प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे लक्ष वेधले होते. राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांकडून सहसंचालक, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाकडे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रस्ताव सादर केले होते. या प्रस्तावाला शासन निर्णय काढण्यासाठी मंत्रालयात पाठविण्यात आले आहे. या प्रस्तावांना मंत्रालयातून अजून मान्यता न मिळाल्यामुळे शेकडो महाविद्यालयात बायोफोकल अभ्यासक्रमांसाठी हजारो विद्यार्थ्यांना वंचित राहावे लागत आहे. या प्रश्नावर रवींद्र चव्हाण यांनी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांना पत्र पाठवून कनिष्ठ महाविद्यालयांच्या योग्य प्रस्तावांना मान्यता देण्याची विनंती केली आहे.

## त्या कंत्राटदारावर कारवाई करा, सकल मराठा समाजाची पोलीस आयुक्तांकडे मागणी

**ठाणे :** ठाणे महापालीकेच्या वर्तकनगर प्रभाग समितीच्या हद्दीतील प्रभाग क्रमांक चार मधील राजमाता जिजाऊ उद्यानाच्या नावाच्या कमानीची तोडफोड केल्याबद्दल त्याठिकाणी काम करत असलेल्या कंत्राटदारावर कारवाई करून त्याचे नाव काळ्यासुचित समाविष्ट करण्याची मागणी मराठा क्रांती मोर्चा - सकल मराठा समाजाच्या रमेश आंब्रे, अजित चव्हाण आणि राजदीप खानगावकरचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार ॲड निरंजन डावखरे यांच्या आमदार निधीतून स्थानिक नगरसेविका रेश्मा आंब्रे यांच्या संकल्पनेतून राजमाता जिजाऊ उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे. या उद्यानाच्या माध्यमातून राजमाता जिजाऊना आदरांजली वाहण्यात आली आहे.

## कोपरीतील रहिवाशांचे आंदोलन

**ठाणे:** कोपरीतील कन्हैय्यानगर-ठाणेकरवाडी स्मशानभूमीत पशू, पक्षी आणि प्राण्यांसाठी दहनवाहिनी उभारण्याच्या महापालिकेच्या प्रस्तावाला रहिवाशांनी तीव्र विरोध केला आहे. भाजपाचे माजी ज्येष्ठ नगरसेवक भरत चव्हाण व भाजयुमोचे सचिव ओमकार चव्हाण यांच्यासह रहिवाशांनी आंदोलन करून मुंबई महापालिकेच्या धर्तीवर अन्य ठिकाणच्या राखीव भूखंडावर प्राणी दहनवाहिनी उभारावी, अशी आग्रही मागणी केली आहे. अन्यथा, आणखी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

राज्य सरकारच्या माध्यमातून ठाणे महापालिकेने कोपरी येथील स्मशानभूमीच्या विकासासाठी साडेबारा कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. मात्र, २०१७ पासून स्मशानभूमीचे काम संथ गतीने सुरू आहे. स्मशानभूमीतील गैरसोयींबद्दल कोपरीतील रहिवाशांमध्ये नाराजी असतानाच, या स्मशानभूमीतच प्राण्यांसाठी दहनवाहिनी उभारण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने तयार केला आहे. या संदर्भातील माहिती भाजपाचे माजी ज्येष्ठ नगरसेवक भरत चव्हाण व ओमकार चव्हाण यांनी माहिती अधिकाराच्या माध्यमातून मिळविली. त्यानंतर आज स्मशानभूमीबाहेर आंदोलन करण्यात आले.

कोपरीतील रहिवाशांसह कोणाचाही प्राण्यांच्या दहनवाहिनीला विरोध नाही. परंतु, मानवासाठीच्या स्मशानभूमीतच पशू, पक्षी आणि प्राण्यांचे दहन करण्याचा निर्णय हा नागरिकांच्या भावनांशी खेळणारा आहे. या प्रस्तावातून टाळूवरील लोणी खाण्याचा प्रयत्न महापालिका प्रशासन व ठेकेदाराकडून केला जात आहे, असा आरोप भरत चव्हाण यांनी केला. गेल्या ८-९ वर्षांपासून स्मशानभूमीचे काम संथगतीने सुरू आहे. या कामाच्या ठेकेदाराला अधिकाऱ्यांकडून पाठीशी घातले जात असून, मूळ स्मशानभूमीऐवजी नवी कामे काढली जात आहेत. या कामाचे थर्ड पार्टी ऑडिट करण्याची आवश्यकता आहे. तर येत्या सहा महिन्यांत काम पूर्ण न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल. तसेच कोणत्याही परिस्थितीत या स्मशानभूमीतच प्राण्यांची दहनवाहिनी उभारण्यास विरोध राहील, असा इशारा भरत चव्हाण व ओमकार चव्हाण यांनी दिला.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नांनी 'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो' प्रकल्पाला मिळणार गती

## पहिल्या टप्प्यातील कामासाठी १४०० रुपये कोटी रुपयांची निविदा मंजुरी अंतिम टप्प्यात,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाणेकरांना भेट

**ठाणे** - ठाणेकरांचा प्रवास सुखकर व्हावा, त्यांच्या वेळेची बचत व्हावी यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नांनी 'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो'च्या (वर्तुळाकार मेट्रो) कामाला केंद्र आणि राज्य शासनाने मंजूरी दिली आहे. मेट्रो प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण व्हावा यासाठी ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाकडे पाठपुरावा करत आहेत. मेट्रो प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासाठी आज मेट्रो प्रकल्पाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत खासदार नरेश म्हस्के यांनी बैठक घेतली. बैठकीत २०२९ पर्यंत 'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो' प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली आहे.



**लवकरच होणार कामाचे भूमिपूजन**

**वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत खासदार नरेश म्हस्के यांची बैठक संपन्न**

ठाण्याचा वाढता विस्तार लक्षात घेऊन ठाणेकरांची वाहतूक कोंडीतून सुटका व्हावी यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रोच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या प्रकल्पाला तात्काळ मंजुरी देऊन भरीव निधी मंजूर केला. नुकत्याच दिल्लीत झालेल्या नगर विकास आणि गृहनिर्माण विषयक स्थायी समितीच्या बैठकीत नरेश म्हस्के यांनी कामाला गती मिळावी यासाठी मुद्दा उपस्थित केला होता. आज खासदार नरेश म्हस्के यांनी ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो प्रकल्पाचे प्रकल्प संचालक राजीव त्यागी, मुख्य प्रकल्प अधिकारी सुनिलकुमार गर्ग, व्यवस्थापक प्रविण पापोळकर यांच्या समवेत कामाच्या प्रगतीबाबत आढावा बैठक घेतली व प्रकल्पाबाबत सविस्तर चर्चा केली. विविध सूचनाही करण्यात येऊन काही महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

१२ हजार २०० कोटींची मंजूरी असलेल्या हा अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो प्रकल्प २९ कि.मी. लांबीचा आहे. २६ कि.मी. जमिनीवरून तर ३ कि.मी. जमिनी खालून (भूमिगत) ही रेल्वे धावणार आहे. याच्या मार्गिका अंतिम करण्यात आल्या आहेत. एकूण २२ स्थानके उन्नत तर २ स्थानके भूमिगत असणार आहेत. भूमिगत असलेली स्थानके ही जुने ठाणे रेल्वे स्थानक आणि नवीन ठाणे रेल्वे स्थानक यांना जोडणारी असणार आहे. भूमिगत रेल्वे प्रकल्पाबाबत नागरिकांमध्ये काही गैरसमज निर्माण झाले होते. भूमिगत रेल्वेमुळे कोणत्याही इमारती अथवा बांधकामांस बाधा किंवा अडचण निर्माण होणार नसल्याचे आजच्या बैठकीत स्पष्ट करण्यात आले. पहिल्या टप्प्यातील रायलादेवी ते बाळकूम नाका या २० किलोमीटर लांबीच्या कामासाठी १४०० रुपये कोटी रुपयांची निविदा मंजूरीच्या अंतिम टप्प्यात आली आहे, अशी माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली आहे.

'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो' प्रकल्पामध्ये वागळे इस्टेट, रोड नं. २२, लोकमान्य नगर, पोखरण रोड नं.१, पोखरण रोड नं.२, ग्लॅडी अल्वारिस रोड, हिरानंदानी मिडोज, हिरानंदानी इस्टेट, कोलशेत, बाळकुम, राबोडी, ठाणा कॉलेज रोड, ठाणे स्टेशन या परिसरातून ही अंतर्गत मेट्रो धावणार आहे. सीआरझेडच्या अडचणीमुळे बाळकुम नाका ते रायलादेवी मार्गाची निविदा ३ महिन्यांनी निघणार आहे. वडवली, कावेसर येथे 'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो' प्रकल्पाच्या डेपोचे सर्वेक्षण सुरु आहे. लोकांच्या काही तक्रारी असून त्या दुर करुन डेपो बांधणीच्या कामाची निविदा अंतिम टप्प्यात आली आहे. 'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो' ची स्थानके अत्याधुनिक आणि आयॉनिक करण्याची सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. त्यानुसार ही स्थानके बांधण्याकरता नियोजन करण्यात येत आहे. त्यासाठी काही सल्लागारांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच उर्वरित सल्लागारांची नेमणूक करण्यासाठी निविदा काढण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. डिसेंबर २०२९ पर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. काम सुरु असतांना विविध शासनाचे विभाग, ठाणे महापालिका, पाणीपुरवठा विभाग, मलनिस्सारण, महानगर गॅस, महावितरण या संदर्भातील अडचणींवर मात करण्याकरता सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे. 'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो' कामाचे लवकरच भूमिपुजन करण्यात येऊन ठाणेकर जनतेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एक चांगली भेट देणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून 'बदलते ठाणे' अंतर्गत विविध प्रकल्प ठाण्यात पूर्णत्वास येत आहेत. 'ठाणे अंतर्गत रिंग रेल्वे मेट्रो' प्रकल्पामुळे वाहतूक कोंडीतून ठाणेकरांची मुक्तता होणार असून वेळेची बचत होणार आहे. पर्यावरणाचेही या प्रकल्पामुळे रक्षण होणार असून ठाणेकरांच्या वतीने खासदार नरेश म्हस्के यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत.

# स्मार्ट ई-बस लवकरच एसटीच्या ताफ्यात दाखल होतील-मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**पुणे:** ए.आय. तंत्रज्ञानावर आधारित एकात्मिक सुरक्षा प्रणाली असलेल्या स्मार्ट ई- बसेस लवकरच एसटीच्या ताफ्यात दाखल होतील. असा विश्वास परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. ते पुण्यामध्ये स्मार्ट ई-बस सादरीकरण प्रसंगी पत्रकारांशी बोलत होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्य शासनाचे ई- वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण एसटी महामंडळाने देखील अंगीकारले असून भविष्यात घेण्यात येणाऱ्या स्वमालकीच्या ५ हजार बसेस पैकी दरवर्षी किमान १ हजार बसेस या ई- बसेस घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अर्थात, या ई-बसेस देखील ए.आय. तंत्रज्ञानावर आधारित एकात्मिक सुरक्षा प्रणाली बसवलेल्या असाव्यात अशा सूचना संबंधित बस तयार करणाऱ्या कंपनीला आम्ही सांगितले आहे. त्यानुसार त्यांनी उत्तर प्रदेश परिवहन महामंडळासाठी तयार केलेल्या स्मार्ट ई- बसचे सादरीकरण करण्यात आले.

नव्या ई-बसमध्ये चालकांच्या हालचाली वर लक्ष ठेवणारे ए.आय. तंत्रज्ञानावर आधारित ण्ऊ कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. गाडी चालवताना जर चालक जांभळ्या देत असेल किंवा मोबाईल वापरत असेल तर सदर कॅमेरे मागील प्रवाशांना याबाबत अलर्ट करतील तशा प्रकारचा धोक्याचा अलार्म देखील वाजवला जाईल, अशी यंत्रणा नव्या स्मार्ट ई- बसेस मध्ये असणार आहे. तसेच महिलांची सुरक्षितता लक्षात घेता प्रवाशांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी देखील बसमध्ये दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. बसला अचानक आग लागल्यास ती आग अल्पावधीत विझवण्यासाठी फोम बेस अग्नीशामक यंत्रणा बसमध्ये असावी असे मत यावेळी मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केले. याबरोबरच स्वारगेटच्या घटनेनंतर बंद बस ही कोणत्याही बाह्य हस्तक्षेपामुळे उघडली जाणार नाही. तसा प्रयत्न केल्यास धोक्याचा अलार्म वाजेल अशी यंत्रणा देखील नव्या स्मार्ट ई-बसमध्ये बसविण्यात येणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी सांगितले

# दादासाहेब फाळके चित्रनगरीला 'पीएसयू लीडरशीप अँड एक्सेलन्स' पुरस्कार जाहीर

**मुंबई:** चित्रीकरणासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या एका ठिकाणी मिळाव्यात, यासाठी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने उपलब्ध करून दिलेल्या 'एक खिडकी प्रणाली'करिता 'इकॉनॉमिक टाइम्स'च्या वतीने महामंडळास 'इटी पीएसयू लीडरशीप अँड एक्सेलन्स' पुरस्कार जाहीर झाला आहे. १९ जून रोजी दिल्ली येथे होणाऱ्या सोहळ्यात महामंडळास या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

राज्यात आणि केंद्रात उत्तम सार्वजनिक सुविधा प्रदान करणाऱ्या शासकीय संस्थांना 'इकॉनॉमिक टाइम्स'च्या वतीने 'इटी पीएसयू लीडरशीप अँड एक्सेलन्स' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यंदा पुरस्काराचा हा मान दादासाहेब फाळके चित्रनगरीला मिळाला आहे. महामंडळाकडून २०१८ पासून राबविण्यात येत असलेल्या 'एक खिडकी प्रणाली'च्या यशाकरिता महामंडळास या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

दादासाहेब फाळके चित्रनगरीद्वारे मालिका-चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी लागणाऱ्या विविध परवानग्या चित्रपट निर्मितीसंस्थांना जलदगतीने आणि एकाच ठिकाणी मिळाव्यात, या उद्देशाने २०१८ साली 'एक खिडकी प्रणाली' सुरू करण्यात आली होती. या प्रणालीद्वारे चित्रीकरणासाठी लागणारी परवानगी प्रक्रिया जलद आणि सहज पद्धतीने करता येते. या प्रणालीमुळे मालिका, जाहिरातपट, माहितीपट, चित्रपट इत्यादींच्या चित्रीकरणासाठी लागणाऱ्या विविध विभागांच्या परवानग्या सुलभ रीतीने आणि ठरावीक मुदतीमध्ये मिळणे शक्य झाले आहे. महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-

आधी मुंबई महानगर प्रदेशापुरती मर्यादित असणाऱ्या या 'एक खिडकी प्रणाली'चा मार्च महिन्यात विस्तार करण्यात आला आहे. यामुळे आता संपूर्ण महाराष्ट्रभरातील कोणत्याही स्थळी चित्रीकरणासाठी आवश्यक असणार्या विविध विभागांच्या परवानग्या या प्रणालीमुळे निर्मितीसंस्थांना सुलभपणे मिळताहेत. याचा मराठी आणि हिंदी, तसेच अन्य भाषांतीलही निर्मितीसंस्थांना लाभ होत आहे. याद्वारे राज्यात चित्रपटनिर्मितीला प्रोत्साहन देण्याचा महामंडळाचा प्रयत्न आहे.
- **स्वाती म्हसे-पाटील**, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ

## चित्रनगरीच्या 'एक खिडकी प्रणाली'साठी दिल्लीत होणार सन्मान

पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रणाली या वर्षी मार्च महिन्यात तंत्रज्ञानाच्या मदतीने अद्ययावत करण्यात आली आहे. पूर्वी महाराष्ट्रातील कोणत्याही स्थळासाठी चित्रीकरण परवानगी घ्यायची असल्यास संबंधित विभागांना भेट देऊन परवानगी मिळवावी लागत असे. यामध्ये निर्माते आणि चित्रकर्मींचा बराच वेळ खर्ची होत असे. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने 'इज ऑफ डूइंग बिझनेस' अंतर्गत 'एक खिडकी प्रणाली २.०' ही अद्ययावत सुविधा निर्माण केली आहे. याशिवाय, चित्रीकरणासाठी विविध विभागांतर्गत उपलब्ध असलेल्या चित्रीकरण स्थळांची माहितीही या डिजिटल प्रणालीच्या माध्यमातून चित्रपट निर्मात्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रणालीची विशेष दखल घेत इकॉनॉमिक टाइम्सने 'ईटी पीएसयू लीडरशीप अँड एक्सेलन्स' या पुरस्कारासाठी त्याची निवड केली आहे. देशभरात उत्तम सार्वजनिक सुविधा पुरवणाऱ्या शासकीय-निमशासकीय संस्थांना हा पुरस्कार दिला जातो. 'एक खिडकी प्रणाली'च्या माध्यमातून चित्रनगरीने चित्रीकरणासाठी लागणाऱ्या परवानग्यांबाबत उपलब्ध करून दिलेल्या अद्ययावत व्यवस्थापन सुविधेची दखल घेत यंदा 'इटी पीएसयू लीडरशीप अँड एक्सेलन्स' पुरस्कारासाठी या प्रणालीची निवड करण्यात आल्याचे इकॉनॉमिक टाइम्सने नमूद केले आहे. राजधानी दिल्लीमध्ये १९ जून २०२५ रोजी होणाऱ्या पुरस्कार सोहळ्यात दादासाहेब फाळके चित्रनगरीला या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# आषाढी यात्रेसाठी राज्य परिवहन महामंडळाकडून ५ हजार २०० विशेष बसेस सोडणार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## ग्रुप बुकींग असल्यास राज्याच्या कोणत्याही गावातून थेट पंढरपूर पर्यंत बस मिळणार

**पंढरपूर/ठाणे:**-आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोप्रयातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी

राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार २०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रा नियोजनासाठी पंढरपूर येथे बोलावलेल्या एसटीच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री प्रतापसरनाईक म्हणाले, यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगारात संपर्क साधावा असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केली आहे.

आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक-प्रवाशी पंढरपुरात येतात. अनेक प्रवाशी स्वतःच्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा विविध पालखींबरोबर चालत दिंडीने येतात या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. ४० पेक्षा जास्त भाविक प्रवाशांची संख्या असल्यास त्यांना त्यांच्या गावापासून विशेष बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. अर्थात या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत.

तसेच बस चालकांना व वाहकांना कोणाची राहण्याची व्यवस्था करावी त्याचबरोबर त्यांना आंघोळीसाठी गरम पाणी उपलब्ध करून द्यावे. बस स्थानकातून बस प्रवाशांना घेऊन जाण्याअगोदर बसची देखभाल दुरुस्ती करावी. एसटी बसच्या तात्काळ दुरुस्तीसाठी ज्यादा तांत्रिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी अशा सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी केल्या.

भाविक-प्रवाशांनी, एसटीच्या सुरक्षित प्रवासी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी यावेळी केले.

तसेच यात्रा काळात पंढरपूर येथे येणाऱ्या सर्व एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चहा - नाश्ता व जेवणाची मोफत सोय करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री प्रताप सरनाईक यांनी दिली. गतवर्षी एसटीने आषाढी यात्रेनिमित्त ५००० विशेष बसेस सोडल्या होत्या. याव्दारे यात्राकाळामध्ये सुमारे २१ लाख, भाविक - प्रवाशांची सुखरूप ने-आन एसटीने केली होती अशी माहिती राज्य परिवहन महामंडळाचे अधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकीट न काढणे, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे अशाप्रकारे फुकट प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्याचे नियोजन केले आहे अशा फुकटया प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवूनअसणार आहेत.

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक प्रवासी आपल्या गावाकडे मार्गस्थ होतात अशा वेळी रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊन प्रवासाचा खोळंबा होतो यंदा स्थानिक पोलीस प्रशासनाच्या मदतीने ३६ पेक्षा जास्त वाहतूक नियंत्रक व सुरक्षा रक्षक वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी काम करणार आहेत. त्यामुळे रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी पोलीस प्रशासनाला एसटीची मदत होणार आहे.

पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून गाड्या सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठीयात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आदी सोयी-सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

# कावेसर तलाव सुशोभिकरणाविरोधात पुन्हा एकदा रहिवाशांचा एल्गार

**ठाणे:** हिरानंदानी इस्टेट परिसरातील निसर्गरम्य कावेसर तलावाच्या कॉंक्रिटीकरणासह सुशोभिकरणाला रहिवाशांचा वाढता विरोध असून, मुसळधार पावसात रहिवाशांनी पुन्हा एकदा एल्गार केला. यापूर्वी जागतिक पर्यावरण दिनी केलेल्या निदर्शनानंतर 'कावेसर तलाव वाचवा' घोषणा देत मोठ्या संख्येने रहिवाशांनी एकत्र येत जनजागृती करण्यासाठी रॅली काढली. त्यात शाळेतील विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. महापालिकेने सुशोभिकरणाचा निर्णय रद्द करेपर्यंत ही कॉंक्रिटीकरणविरोधातील लढाई सुरूच राहील, असा इशारा देतानाच हा परिसर सायलेंट झोन म्हणून जाहीर करावा, अशी मागणी रॅलीतून करण्यात आली.

ठाणे महापालिकेने स्थानिक रहिवाशांना विश्वासात न घेता कावेसर तलावाच्या सुशोभिकरणाचा निर्णय रहिवाशांवर लादला आहे. त्याविरोधात स्थानिक रहिवाशी संघटीत होत आहेत. हिरानंदानी इस्टेट, ब्रह्मांड, पातलीपाडा येथील रहिवाशांनी समाजमाध्यमातून एकत्र येत 'सेव्ह कावेसर लेक सिटीझन्स मुव्हमेंट' ही चळवळ उभारली आहे. यापूर्वी जागतिक पर्यावरण दिनी कावेसर तलावाच्या काठावर निदर्शने करण्यात आली होती. त्यानंतर ऑनलाईन याचिका तयार करून त्यावर हजारो नागरिकांनी स्वाक्षरी करून सुशोभिकरणाला विरोध दर्शविला आहे. आज पुन्हा रहिवाशी एकत्र आले. त्यांनी पातलीपाडा येथील ऋतू सर्कलहून कावेसर तलावापर्यंत मोर्चा काढला. कावेसर तलाव वाचवा अशा घोषणा रहिवाशांनी दिल्या

कावेसर तलाव हा निसर्गरम्य परिसर आहे. या परिसरात पक्षी असून, शांतता आहे. तर बाजूच्याच कॉंक्रिटच्या जंगलात गजबजाट आहे. त्यामुळे पुढील पिढीला निसर्ग पाहण्यासाठी तरी कावेसर तलाव हा नैसर्गिक पद्धतीनेच कायम ठेवावा. कावेसर तलावाचा परिसर हा सायलेंट झोन म्हणून जाहीर करावा. हिरानंदानी इस्टेट परिसरात अनेक कृत्रिम बगिचे आहेत. कावेसर तलावाचा परिसर हे एकमेव नैसर्गिक ठिकाण राहिले आहे, ते वाचवावे, असा आग्रह रहिवाशांनी धरला. एका ज्येष्ठ नागरिक महिलेने आम्हाला कॉंक्रिट रस्त्याऐवजी मातीतून चालणे आवडते. त्यामुळे कॉंक्रिट मार्गाचा आग्रह धरू नये.निसर्गाप्रमाणेच तलावांची जोपासना करावी, अशी प्रतिक्रिया नोंदवून सुशोभिकरणाचा निर्णय रद्द करण्याची मागणी केली.

## महापालिका आयुक्तांचा पाहणी दौरा

## सखल भागात पाणी साचणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना

**ठाणे:**- पावसामुळे शहरातील ज्या सखल भागात पाणी साचते, अशा ठिकाणांची पाहणी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अधिकाऱ्यांसमवेत केली. अतिवृष्टीच्या काळात सखल भागात पाणी साचून नागरिकांची गैरसोय होणार नाही या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचना आयुक्तांनी सर्व अधिकाऱ्यांना दिल्या. सखल भागात साचत असलेले पाणी पंपाच्या साहाय्याने नाल्यात सोडण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. तसेच रस्त्यावरील पावसाळी गटारे पुन्हा स्वच्छ करावीत जेणेकरुन पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढेल या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

या पाहणीदौ-यास अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी.गोदेपुरे, मनीष जोशी, शंकर पाटोळे, शंकर सांगळे यांच्यासह कार्यकारी अभियंता उपस्थित होते.यावेळी विटावा सबवे, पेढया मारुती परिसर, मासुंदा तलाव, वंदना टॉकीज परिसर, चिखलवाडी, भांजेवाडी, ज्ञानसाधना महाविद्यालय आदी ठिकाणच्या सखल भागांची पाहणी आयुक्त श्री. राव यांनी केली. विटावा सबवे येथे ४० एचपी चे पंप बसविण्यात आले असून त्याची पाहणी आयुक्तांनी केले या ठिकाणी २४ तासांसाठी दोन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. तसेच हवामान खात्याकडून येणारा पावसाचा इशारा व भरतीच्या वेळा पाहून या ठिकाणचे पंपही सुरू ठेवण्याच्या सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.

पेढया मारुती परिसरात साचत असलेल्या पाण्याचा निचरा जलदगतीने व्हावा यासाठी पंप बसविण्यात आले असून क्रॉस कलव्हर्टची सफाई करणे, पावसाळ्याच्या कालावधीत त्या ठिकाणी २४ तास मनुष्यबळासह पंप सुरू ठेवण्याचे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी दिले.वंदना एस.टी डेपो हा परिसर पावसाळ्यात जलमय होतो या ठिकाणी महापालिकेने पंप उपलब्ध केले आहेत. तसेच अतिवृष्टीच्या काळात सदर ठिकाणी महापालिका कर्मचारी ठेवण्याबाबतच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. चिखलवाडी परिसरात सद्यस्थितीत बसविण्यात आलेल्या पंपाची पाहणी आयुक्तांनी केली. अतिवृष्टीच्या काळात येथील पंप पूर्ण क्षमतेने सुरू राहतील यासाठी सतर्क रहावे व नागरिकांच्या घरात पाणी जाणार नाही या दृष्टीने आवश्यक ती सर्व काळजी घेण्याच्या सूचनाही आयुक्त श्री. राव यांनी यावेळी दिल्या. पावसाळ्यासाठी महापालिकेची संपूर्ण यंत्रणा सज्ज आहे. महापालिका हद्दीतील ३०० कि.मी नाल्याची सफाई करण्यात आलेली आहे. मशीनच्या साह्याने ड्रेनेज स्वच्छ करण्याचा उपक्रम देखील महापालिकेने हाती घेतला आहे. महापालिका क्षेत्रात एकूण ३४ सखल भाग असून त्यापैकी १४ सखल भागात थोड्याशा पावसात पाणी साचते यासाठी एकूण ६४ पंपाची व्यवस्था करण्यात आली असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना

मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund
फुफ्फुस प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
अपघात शस्त्रक्रिया
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
अपघात
ह्रदयरोग
डायलिसिस
हाताचे प्रत्यारोपण
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
विद्युत अपघात रुग्ण
नवजात शिशुंचे आजार
बर्न रुग्ण
मेंदूचे आजार
कर्करोग शस्त्रक्रिया
Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301
Emergency
7777008464
9076229076



# दिवा स्टेशन परिसरातील तलावातील कचरा व गाळ तातडीने साफ करा-शैलेश पाटील



दिवा:-दिवा स्टेशन परिसरातील तलावाची स्वच्छता व साफसफाई होत नसल्याने शिवसेनेचे माजी नगरसेवक व उप शहरप्रमुख शैलेश पाटील यांनी पालिका प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे. तलावातील गाळ व कचरा तातडीने साफ करण्यात यावा अशी मागणी पाटील यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

दिवा पूर्वेला स्टेशन लगत असणारे तलाव पूर्णतः कचऱ्याने भरले असून या तलावातील कचरा अद्याप महापालिकेमार्फत साफ करण्यात आलेला नाही. पालिका अधिकाऱ्यांना वारंवार फोन करूनही प्रशासन या प्रश्नाकडे लक्ष देत नसल्याने शैलेश पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे.तलावाच्या स्वच्छतेकडे ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समितीतील अधिकारी लक्ष देत नसल्याने या तलावात घाणीचे साम्राज्य वाढले असून संपूर्ण तलावात कचरा साचला आहे. त्याचबरोबर या तलावातील गाळ साफ करण्यात यावा अशी ही मागणी माजी नगरसेवक शैलेश पाटील यांनी केली आहे.



फोटो-सुदेश सकपाळ